“श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखडा, पंढरपूर, जि.सोलापूर या आराखड्यांतर्गत” कामांसाठी सन २०२६-२७ मधील निधी वितरणाबाबत.

# महाराष्ट्र शासन
## नियोजन विभाग
### शासन निर्णय क्रमांकः निधीवि-२०२६/प्र.क्र.३८/तीर्थक्षेत्र विकास कक्ष/(भाग-१)/ई-१८६१४५४

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : १४ ऑक्टोबर, २०२६

**वाचा :**

१) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक:तीक्षेवि-२०२६/प्र.क्र.१८/का.१४४४-अ/ई-१६०८९७१, दि. १८.०६.२०२६.

२) जिल्हाधिकारी, सोलापूर कार्यालयाचे क्र. जि.नि.स. / श्रीविरुमंपविआ / २०२६ / ३३६१, दि.२२.०९.२०२६ चे पत्र.

**प्रस्तावना :**

वाचा क्र.१ येथील शासन निर्णयान्वये रुपये ३९९३.९० कोटी किंमतीच्या “श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखडा, पंढरपूर, जि. सोलापूर” या आराखड्यातील कामांना मंजूरी देण्यात आली आहे. वाचा क्र.२ येथील पत्रान्वये जिल्हाधिकारी, सोलापूर कार्यालयाने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखडा, पंढरपूर, जि. सोलापूर” या आराखड्यांतर्गत भूसंपादनाच्या कामाकरिता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता निधी उपलब्ध करुन देण्याची विनंती केली आहे. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, सोलापूर यांना सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता रुपये १००.०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :

“श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखडा, पंढरपूर, जि. सोलापूर” या आराखड्यातील कामांच्या अनुषंगाने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता रुपये १००.०० कोटी (रुपये शंभर कोटी फक्त) इतका निधी या आराखडयाचे संनियंत्रण अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी, सोलापूर यांना वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे :-

(रु.कोटी)

| अ.क्र. | सामायिक लेखाशीर्ष व उद्दीष्ट | सन २०२६-२७ करीता अर्थसंकल्पित निधी | यापूर्वी सन २०२६-२७ मध्ये या आराखडयासाठी वितरीत निधी | जिल्हाधिकारी, सोलापूर यांना वितरित करावयाचा निधी |
|---|---|---|---|---|
| १. | ५४५२०२११<br>५३-मोठी बांधकामे | ५००.००००<br>+ ६००.०००१ (पु.मा.)<br>= **११००.०००१** | ०.०० | १००.०० |

२. “श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखडा, पंढरपूर, जि. सोलापूर” या आराखडयाअंतर्गत मंजूर कामांवर होणारा सदरहू खर्च सामायिक “लेखाशिर्ष ५४५२ पर्यटनावरील भांडवली खर्च, (००) (१५) तीर्थक्षेत्र व पर्यटन स्थळ विकास आराखडा (कार्यक्रम) (५४५२ ०२११), ५३-मोठी बांधकामे,” याखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील तरतूदीमधून भागविण्यात यावा.

३. सदर प्रयोजनासाठी झालेला प्रत्यक्ष खर्च व प्रधान महालेखापाल, मुंबई यांचे कार्यालयाने नोंदविलेला खर्च याचा ताळमेळ घालण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी करावी. तसेच वितरीत केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी शासनास तात्काळ सादर करावे.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभाग, अनौपचारिक संदर्भ क्र.४३०/२०२६/व्यय-८, दिनांक ०५.१०.२०२६ अन्वये प्रदान केलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६१०१४१८०८४५७६१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

GEETANJALI SHRIRAM BAVISKAR

Digitally signed by GEETANJALI SHRIRAM BAVISKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Planning Department, 2.5.4.20=A03A9E9727B369EEB75B33D163EE9206A6B63C23E1DB3F22DAFB1DD79B967A3D, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5EAB451FA908D44F55D92D15BD59E941FB8BB2966266D020EB30C8667F18AD4B, cn=GEETANJALI SHRIRAM BAVISKAR
Date: 2026.10.14 18:09:41 +05'30'

**(गीतांजली बाविस्कर)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

जिल्हाधिकारी, सोलापूर यांना आवश्यक कार्यवाहीसाठी,

**प्रत,**

१) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
२) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर
३) जिल्हा नियोजन अधिकारी, सोलापूर
४) जिल्हा कोषागार अधिकारी, सोलापूर
५) अर्थसंकल्प शाखा, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
६) कार्यासन (व्यय-८, अर्थ -१६), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७) निवडनस्ती, नियोजन विभाग, तीर्थक्षेत्र विकास कक्ष, मंत्रालय, मुंबई